**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

## विद्यापीठात सौर ऊर्जा प्रकल्पाचे पद्मविभूषण डॉ.के. कस्तुरीरंगन यांचे हस्ते उद्घाटन

### महत्वाकांक्षी प्रकल्प

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील विविध इमारतींच्या छतांवर स्थापन केलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था (इसरो), बेंगळूरचे माजी अध्यक्ष पद्मविभूषण डॉ.के. कस्तुरीरंगन यांचे शुभहस्ते व कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमाप्रसंगी उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, माजी प्र-कुलगुरु डॉ. जयकिरण तिडके, व्य.प. सदस्य डॉ. प्रसाद वाडेगांवकर, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, वि. व ले. अधिकारी डॉ.बी.डी. क-हाड, आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, एल.एल.ई.चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

फित कापून सौर ऊर्जा प्रकल्पाच्या फलकाचे उद्घाटन पद्मविभूषण डॉ.के. कस्तुरीरंगन यांनी केले. याप्रसंगी स्थापित सौर ऊर्जा प्रकल्पाची त्यांनी पाहणी केली. पर्यावरणाच्या दृष्टीने व वीजेची कमतरता भरुन निघण्यासाठी हा प्रकल्प अतिशय महत्वाचा असून विद्यापीठाने यासाठी पुढाकार घेवून कार्यान्वित केल्याबद्दल कुलगुरूंचे त्यांनी अभिनंदन केले.

भारत सरकारच्या 'स्वच्छ भारत - स्वच्छ ऊर्जा' या उपक्रमांतर्गत विद्यापीठाने रुफटॉप सोलर प्लँटच्या माध्यमातून नैसर्गिक वीजनिर्मितीसाठी मे. क्लीन मॅक्स एनव्हायरो एनर्जी सोल्युशन्स प्रा.लि., मुंबई या कंपनीशी करार केला. या करारानुसार ही कंपनी विद्यापीठाला पंचवीस वर्षे रुपये ३.६२ प्रती युनीट या दराने वीज उपलब्ध करुन देणार आहे. विद्यापीठाला वर्षाला १२ लक्ष युनीटची गरज असून त्यापैकी ८.५ लक्ष युनीट वीजनिर्मिती सौर ऊर्जा प्रकल्पातून होणार असल्याने वर्षाकाठी विद्यापीठाची ३० लक्ष रुपयांची बचत होणार आहे. याशिवाय ८३५ टन कार्बनडायऑक्साईडचे उत्सर्जन कमी होणार असल्याने निसर्गाचे व पर्यावरणाचे संवर्धन होण्यास विद्यापीठाचा हातभार लागणार आहे. पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विद्यापीठाच्या कार्याचा देशपातळीवर गौरव झाला आहे. याप्रसंगी विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विविध प्राधिकारणींचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २१/१२/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी